सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडयास" मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवि-२०२४/प्र.क्र.१६/का.१४४४-अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०५ मार्च, २०२४.

संदर्भ:
१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का.१४४४, दिनांक ०४ जून, २०१५.
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का. १४४४, दिनांक १९ जुलै, २०१६.
३) नियोजन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक : तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का.१४४४, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२२.
४) जिल्हाधिकारी, सातारा यांचे क्रमांक :जिनिस/पर्यटन कार्या-६/२८४/२०२४, दिनांक १२/०२/२०२४ चे पत्र.
५) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीच्या दि.२२/०२/२०२४ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना:

नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का.१४४४, दि.०४.०६.२०१५ अन्वये राज्यातील तीर्थक्षेत्र, पर्यटनस्थळ परिसर विकास आराखडा अंतिम करणे व अंमलबजावणीसाठी धोरण / मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहेत. तसेच दि.१९.०७.२०१६ च्या शासन निर्णयान्वये यातील काही तरतूदी/निकष याबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

०२. उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदीनुसार अर्थसंकल्पीय भाषणात नमूद आंतराष्ट्रीय/राष्ट्रीय दर्जाची महत्वाची स्थळे, तीर्थक्षेत्रे परिसर विकास आराखडे यांची व्याप्ती व स्वरूप लक्षात घेऊन, संबंधित आराखडे नियोजन विभागामार्फत राबविण्यात येतात. स्थानिक पातळीवरील सर्व संबधितांशी चर्चा करून विकास आराखडा व त्यास लागणारा निधी याचा आराखडा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय कार्यकारी समितीने तयार करून तो मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीस सादर करण्यात येतो. उच्चाधिकार समिती विकास आराखड्यास मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीची मान्यता प्राप्त करून घेण्यासाठी शिफारस करते.

०३. मा.पालकमंत्री, जि.सातारा यांच्या अध्यक्षतेखालील "जिल्हास्तरीय समितीने सादर केलेला "रू.३८१.५६ कोटी खर्चाचा "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडयाचा" प्रस्ताव नियोजन विभाग, शासन निर्णय दि.०४.०६.२०१५ मधील उच्चाधिकार समितीपुढे सादर करण्याची तरतूद शिथिल करुन शिखर समितीच्या विचारार्थ ठेवण्यास शिखर समितीने अनुमती दिल्याने दि.२२.०२.२०२४ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीसमोर सदर प्रस्ताव मान्यतेस्तव ठेवण्यात आला.

०४. नियोजन विभाग, शासन निर्णय दि.०४.०६.२०१५ अन्वये तीर्थक्षेत्र / पर्यटनस्थळ विकास आराखड्यास मान्यता देणेकरिता मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील स्थापन करण्यात आलेल्या "शिखर समिती" च्या दि.२२.०२.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता घेण्यात आली आहे. "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडा" हया रू.३८१.५६ कोटीच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली.

<u>शासन निर्णय</u> :-

"सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडा" हया रू.३८१.५६ कोटीच्या विकास आराखड्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

०२. "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडया" अंतर्गत कामांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करून घेण्यासाठी जिल्हाधिकारी, सातारा यांना "संनियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, सातारा यांना " संनियंत्रण अधिकारी" ही जबाबदारी पार पाडण्याकरिता स्वतंत्र कर्मचारीवृंद उपलब्ध करून देण्यात येणार नाही. समितीची कार्यकक्षा शासन निर्णयात नमूद केल्यानुसार खालीलप्रमाणे राहील :-

(१) "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडया" अंतर्गत "परिशिष्ट अ" येथील प्रस्तावित कामे दि.३१.०३.२०२६ पर्यंत पूर्ण करण्यात

यावीत. जिल्हाधिकारी, सातारा यांनी केलेल्या सादरीकरणानुसार निश्चित करण्यात आलेली अंमलबजावणी व कार्यान्वयीन यंत्रणांकडून विहित कालमर्यादेत सदर कामे पूर्ण करून घेण्याची जबाबदारी" संनियंत्रण अधिकारी" म्हणून जिल्हाधिकारी, सातारा यांची राहील.

(२) "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडा" मध्ये एकूण रू.३८१.५६ कोटी किमतीच्या मान्यता प्राप्त कामांव्यतिरिक्त कोणत्याही कामांचा समावेश करण्यात येऊ नये.

(३) "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडया" तील कामांची द्विरुक्ती होणार नाही व अशी कामे कोणत्याही अन्य शासकीय योजनेत प्रस्तावित किंवा मंजूर अथवा प्रगतीत नाहीत, ह्याची खातरजमा करण्याची जबाबदारीसुद्धा "संनियंत्रण अधिकारी" म्हणून जिल्हाधिकारी, सातारा यांची राहील.

(अ) आराखड्यासाठी आवश्यक परवानग्या प्राप्त करून घेणेः

(१) "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडया" तील कामांपैकी ज्या कामांकरिता "वनसंवर्धन कायदा, १९८०" अंतर्गत पूर्वपरवानग्या आवश्यक असतील त्यासाठी मान्यता वेळेत केंद्र व राज्य शासनाच्या विभाग/ कार्यालय/प्राधिकरणाकडून प्राप्त करून घेण्याची जबाबदारी "संनियंत्रण अधिकारी" म्हणून जिल्हाधिकारी, सातारा यांची राहील.

(२) "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडया" तील कामे राबविण्यापूर्वी, आवश्यकता असल्यास "पर्यावरण(संरक्षण) कायदा, १९८६" तसेच "प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळ आणि अवशेष कायदा, १९५८" खाली अनुमती व इतर आवश्यक मान्यता/ आवश्यक ना हरकत परवानगी संबंधित केंद्र व राज्य शासनाच्या विभाग/कार्यालय/प्राधिकरणाकडून घेण्याची जबाबदारी "संनियंत्रण अधिकारी" म्हणून जिल्हाधिकारी, सातारा यांची राहील.

(ब) आराखड्यातील कामांना तांत्रिक मान्यता घेणेः

(१) "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना

हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडया" तील कामे सुरू करण्या पूर्वी संबंधित कामांच्या आराखड्यास व अंदाजपत्रकास निश्चित केलेल्या अंमलबजावणी कार्यान्वयीन यंत्रणेचे "सक्षम प्राधिकारी" यांच्याकडून आवश्यकतेनुसार "तांत्रिक मान्यता" प्राप्त करून घ्याव्यात. तसेच ही कामे सुरू करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार, जिल्हा परिषद व नगर पालिका या स्थानिक स्वराज्य संस्था यांची देखील आवश्यक ती मान्यता घेण्यात यावी.

(२) "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडया" तील कामे विहित केलेल्या कालमर्यादेत पूर्ण होण्याकरिता "संनियंत्रण अधिकारी" म्हणून जिल्हाधिकारी, सातारा यांच्या अध्यक्षतेखाली आराखड्याशी संबंधित सर्व अंमलबजावणी व कायान्वयीन यंत्रणांच्या जिल्हा प्रमुखांचा समावेश असलेली एक "जिल्हास्तरीय तांत्रिक समिती", गठीत करण्यात यावी. या समितीमध्ये जिल्हा नियोजन अधिकारी" सदस्य सचिव" असतील. जिल्हास्तरीय तांत्रिक समितीची शक्यतो प्रत्येक महिन्यात एक बैठक घेण्यात यावी. अशा बैठकीस इतर जिल्हा प्रमुख यांना आमंत्रित करण्याबाबत "संनियंत्रण अधिकारी" म्हणून " जिल्हाधिकारी, सातारा" यांना अधिकार राहील.

(क) आराखड्याचे संनियंत्रण व अंमलबजावणीसाठी "जिल्हास्तरीय समिती" व " कार्यकारी समिती" गठीत करणेः

(१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.तीर्थवि-२०१५/प्र.क्र.६/का.१४४४, दिनांक ४ जून, २०१५ मधील सूचनांनुसार, शिखर समितीने मान्यता दिलेल्या "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडा" जिल्हा सातारा यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हास्तरीय समिती" आणि "जिल्हाधिकारी, सातारा तथा संनियंत्रण अधिकारी" यांच्या अध्यक्षतेखाली "कार्यकारी समिती" गठीत करण्यात आली आहे. "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडयाचे" संनियंत्रण व अंमलबजावणी करण्याचे संपूर्ण अधिकार "जिल्हास्तरीय समिती" यांची राहील.

(ड) आराखड्यासाठी आवश्यकतेनुसार सल्लागार नियुक्त करणेः

"सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी

जलपर्यटन आराखडया" तील प्रकल्प अहवाल निश्चित केलेल्या कार्यान्वयीन यंत्रणांमार्फत तयार करण्यात यावेत. अत्यंत आवश्यकता असेल तरच, विशिष्ट व तांत्रिक बाबींशी संबंधित कामांसाठी स्वतंत्र व सक्षम सल्लागार याची नियुक्ती करण्याबाबत "जिल्हास्तरीय समिती" कडून मान्यताप्राप्त करून घ्यावी. असा सल्लागार हा वास्तुरचनाकाराने तयार केलेला आराखडा/ नकाशा यानुसार प्राचीन स्मारके व पुरातत्वस्थळांशी संबंधित कामे स्वतंत्रपणे पूर्ण करण्याची क्षमता व बांधिलकी असलेला असावा. नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागाराकडे अशा प्रकारच्या कामाचा पुरेसा अनुभव असावा. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का. १४४४, दिनांक १९ जुलै, २०१६ अनुसार संबंधित सल्लागारास अदा करावयाचे शुल्क हे **ठोक व वाजवी स्वरूपाचे असावे** व त्याचा खर्च उपलब्ध निधीमधून करण्यात यावा.

(इ) आराखड्यांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांची देखभाल दुरुस्ती:

(१) "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडया" तील कामे विश्वस्त संस्थेच्या मालकीच्या जागेवर करण्यात येणार आहेत अशा कामां संदर्भात विश्वस्त संस्थेकडून "ना हरकत प्रमाणपत्र" प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील. तसेच अशा कामांच्या पूर्णत्वानंतर त्यांची आवश्यक देखभाल व दुरुस्ती, देवस्थान अथवा विश्वस्त संस्थेने करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, सातारा यांनी " संनियंत्रण अधिकारी" म्हणून अशी कामे सुरू होण्यापूवी करारनामा करणे, संबंधित अंमलबजावणी व कार्यान्वयीन यंत्रणांवर बंधनकारक करावे.

१.१. "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडया" अंतर्गत निर्माण होणा-या इतर मालमत्तेची देखभाल व दुरुस्तीसाठीची जबाबदारी व यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद संबंधित अंमलबजावणी व कायान्वयीन यंत्रणांकडून होणे अपेक्षित असून ती जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहील. निर्माण होणा-या अशा मालमत्तेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी कोणताही स्वतंत्र निधी नियोजन विभागामार्फत उपलब्ध करून दिला जाणार नाही.

१.२. "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडया" तील कामांमुळे निर्माण होणा-या भाविकांसाठीच्या सुविधा तसेच पर्यटनस्थळ सर्व नागरिकांसाठी खुले राहील अशी अट देवस्थान अथवा विश्वस्त संस्थेबरोबर होणा-या करारामध्ये समाविष्ट करण्यात यावी.

(ई) आराखड्यांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांकरिता निधी वितरण:

(१) "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडया" करिता शासनाकडून वितरीत होणा-या निधीतून खर्च करताना वित्तीय नियमांचे आणि विविध नियमांतर्गत नेमून दिलेल्या कार्यपद्धतीचे पालन करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत मंजूर/ वितरीत निधीपेक्षा अतिरिक्त खर्च करण्यात येऊ नये ह्याची दक्षता "जिल्हाधिकारी, सातारा" यांची संनियंत्रण अधिकारी म्हणून राहील.

(२) "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडया" च्या एकूण किमतीच्या मर्यादेत, आराखड्यातील एका मंजूर कामामधील बचत ही त्याच आराखड्यातील मंजूर अधिक खर्चाच्या दुसऱ्या कामाकडे समायोजित करण्याचे अधिकार, बचतीच्या कामांमध्ये भविष्यात अतिरिक्त निधीची मागणी करू नये, या अटीच्या अधीन राहून "संनियंत्रण अधिकारी" म्हणून जिल्हाधिकारी, सातारा यांनी जिल्हास्तरीय समितीकडून पूर्व परवानगी घेऊन करावी व त्याचा अहवाल स्वतंत्रपणे शासनास १५ दिवसात पाठविण्याची दक्षता घ्यावी.

(उ) आराखड्याशी संबंधित शासनास सादर करावयाची विवरणपत्रे:

(१) "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडया" च्या निधीमधून करावयाच्या कामांची भौतिक प्रगती, तसेच निधीतून होणाऱ्या खर्चाची विवरणपत्रे" परिशिष्ट ब" मध्ये नमूद केल्यानुसार, कार्यान्वयीन यंत्रणेने दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास न चुकता सादर करावीत. तसेच काम पूर्ण झाल्यावर "काम पूर्णत्वाचा दाखला" आणि निधीबाबतचे "उपयोगिता प्रमाणपत्र" न चुकता शासनास सादर करावे. या बाबींकरिता संनियंत्रण अधिकारी यांची जबाबदारी असेल.

(२) जिल्हा नियोजन अधिकारी, सातारा यांनी उपरोक्त आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.

०३. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील स्थापन करण्यात आलेल्या "शिखर समिती" च्या दि.२२.०२.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिल्यानुसार प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

०४. सदर कामे करताना ऐतिहासिक वास्तूंची मूळ शैली जपण्याचे तसेच पुरातत्वीय जाण असलेल्या संस्थांकडून (भारतीय पुरातत्व विभाग तसेच राज्य पुरातत्वीय विभाग) सदर कामे करुन घेण्यात यावीत.

०५. सदर योजना सन २०२३-२४ या वर्षापासून अंमलात येईल. या योजनेवर येणारा खर्च भागविण्यासाठी विभागासाठी मंजूर असलेल्या नियतव्ययामधून तरतुद करण्यात येईल. तसेच यासाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्यात येत आहे. वित्तीय तरतुद व लेखाशीर्ष याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

०६. "सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडया" संदर्भातील कार्यवाही करतांना दि.२२.०२.२०२४ रोजी पार पडलेल्या शिखर समितीच्या प्राप्त मान्यतेनुसार व देण्यात आलेल्या निदेशांचे तंतोतंत पालन करण्यात येईल, याबाबतची दक्षता "संनियंत्रण अधिकारी" म्हणून जिल्हाधिकारी, सातारा यांनी घ्यावी.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०३०५१५३००२२९१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MILIND RAGHUNATH KULKARNI

Digitally signed by MILIND RAGHUNATH KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT,
2.5.4.20=438fa70bb728385b5c81bde24450c11d5ce0d99ed18a61fb5b1685722e2c2c03, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=DB6FB8A1DB6A8793024B0C8728EB79AB35DD0CAE14DDA9621D73EA4347C7856A, cn=MILIND RAGHUNATH KULKARNI
Date: 2024.03.05 15:39:49 +05'30'

(मिलिंद कुळकर्णी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री ह्यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (गृह व जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मुंबई,
५. मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, (सर्व)
६. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. मा. संसद सदस्य /विधानसभा/ विधान परिषद सदस्य, (सर्व)
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (सर्व)
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-१,मुंबई,
११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर,
१२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३. महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई.
१४. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे
१५. जिल्हाधिकारी, सातारा.
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा.
१७. पोलीस अधिक्षक, सातारा.
१८. उपवनसंरक्षक, सातारा.
१९. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा.

२०. अधीक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ, सातारा.
२१. जलपर्यटन तज्ञ, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ.
२२. विभागीय वन अधिकारी, कोयना/चांदोली-सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कराड.
२३. वनपरिक्षेत्र अधिकारी, हेळवाक.
२४. उप कार्यकारी अभियंता, मंडळ कार्यालय, सातारा.
२५. मुख्य अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हापरिषद सातारा.
२६. मुख्य अभियंता, कोयना सिंचन, कोयना नगर.
२७. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, सातारा.
२८. मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, सातारा.
२९. मुख्य अभियंता,जलसंपदा विभाग, सातारा.
३०. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबई.
३१. उप संचालक, पुरातत्व विभाग, सातारा
३२.भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई-२०,
३३. इंडीयन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन,काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५,
३४. नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-१,
३५. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८,
३६. बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१,
३७. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४
३८.महाराष्ट्र कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी),महाराष्ट्र कमिटी,जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी,मुंबई-१३,
३९.महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई- ४०००२८.
४०. निवड नस्ती (का.१४४४-अ), नियोजन विभाग.

परिशिष्ट-अ

"सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडा"

अ.क्र.	आराखड्याचे नाव	प्रस्तावित कामे	अंदाजित रक्कम (कोटीत)
१	**इको टुरिझम आराखडा**		
	अ) सह्याद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास आराखडा	प्रेक्षागृह, तंबु निवास, सोलर लाईट, फ्लोटिंग, ३D हॅलोग्राम , सफारी रूटचे बळकटीकरण, पर्यटन सफारीकरीता वाहने, सेल्फी पॉईट, प्रवेशद्वार, ३D नकाशे, जन जागृतीपथ चित्रफित/शॉर्ट फिल्म, डॉक्युमेंटरी, बालोद्यान, निसर्ग व साहसी खेळ, सीसीटीव्ही, उपहारगृह, स्कायवॉक, कॅनॉपीवॉक, रासटी, निसर्ग शिक्षणाकरिता (फुलपाखरू, बांबु, औषधी वनस्पती, चरक, पाम, निवडूंग, तृण इ.) ची उद्याने डिजीटल Aquarium स्वच्छतागृह, विक्री स्टॉल, रस्ते, मनोरे, माहिती केंद्र, वन्यप्राण्यांचे पुतळे इ.	४४.९९
	ब. कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडा	**अ. बाधकाम कामे :-** रॅम्प, पॅव्हिलियन, स्टोरेज, कॅफेटेरिया साहित्य, प्रसाधनगृह, कॉक्रिट जेटी इ. **ब. आवश्यक साहित्य :-** फ्लोटिंग जेट्टी, जेट स्की पार्किंग जेट्टी, पॅरासेलिंग बोट, जेट स्की, जेट पॅक, कायाक, रिव्हर राफ्टींग बोट, युटीलिटी व्हेईकल, इलेक्ट्रीक कॅटॅमॅरन, वॉटर स्पोर्टर्स इक्विपमेंट इ.	२२.००
एकूण -इको टुरिझम आराखडा (अ+ब)			६६.९९

२	**प्रतापगड किल्ला जतन आणि संवर्धन**	किल्ला जतन, संवर्धन व दुरूस्तीची कामे, मंदिरे संवर्धन कामे, संग्रहालय निर्मिती, ऑडिओ व्हिज्युअल रूम, ध्वनीक्षेपक, प्रेक्षक गॅलरी, ऐतिहासिक वस्तु विक्री दालने, पार्किंग, क्युआर कोड आधारीत माहितीफलक, लॅडस्केफिंग वर्क, शौचालय, पिण्याचे पाणी, घनकचरा व सांडपाणी व्यवस्था, विद्युतीकरण, CCTV यंत्रणा इ.	१२७.१५
३	**श्री क्षेत्र महाबळेश्वर पर्यटन विकास आराखडा**	मंदिर व परिसर विकास व संवर्धन, रस्ते वाहन तळ, बाजारपेठ विकासकामे, शौचालय, पिण्याचे पाणी, घनकचरा व सांडपाणी व्यवस्था, अन्नछत्र, विद्युतीकरण, आरोग्य, पुतळा उभारणे, मंदिर परिसरात अस्तित्वात असलेल्या प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, पोलिस स्टेशन व प्राथमिक आरोग्य केंद्राचे विस्थापन व निर्मिती करणे, भूसंपादन, CCTV यंत्रणा, अग्निशामक यंत्रणा उभारणे, इ.	१८७.४२
एकूण (१+२+३)			३८१.५६

परिशिष्ट-ब

"सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडा"

विवरणपत्र- १ (भौतिक उद्दिष्ट्ये)

आराखड्यातील एकूण कामांची संख्या	प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या कामांची संख्या	प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाकी असलेल्या कामांची संख्या	कार्यारंभ आदेश देण्यात आलेल्या कामांची संख्या	अंदाजपत्रक स्तरावरील कामांची संख्या	निविदा स्तरावरील कामांची संख्या	पूर्ण झालेल्या कामांची संख्या
१	२	३	४	५	६	७

जिल्हाधिकारी, सातारा तथा "संनियंत्रण अधिकारी"

"सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडा"

विवरणपत्र- २ (भौतिक उद्दिष्ट्ये)

अ.क्र.	कामाचे नाव	कामाची कार्यान्वयीन यंत्रणा	कामासाठी मंजूर निधी	कामासाठी आतापर्यंत उपलब्ध करून दिलेला निधी	कामासाठी आतापर्यंत झालेला खर्च	काम पूर्ण करण्याचा दिनांक	काम पूर्ण झाल्याची टक्केवारी
१	२	३	४	५	६	७	८

जिल्हाधिकारी, सातारा तथा “संनियंत्रण अधिकारी”

“सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडा”

विवरणपत्र- ३ (आर्थिक उद्दिष्ट्ये)

अ			ब		
आराखड्यास प्रशासकीय मान्यतेचा दिनांक व त्यानुसार मंजूर आराखड्याची एकूण किंमत	आराखड्यासाठी आतापर्यंत एकूण वितरीत निधी	आराखड्यासाठी आतापर्यंत एकूण वितरीत निधीपैकी झालेला एकूण खर्च	आराखड्यासाठी सन २०२३-२४ मध्ये एकूण अर्थसंकल्पित तरतूद	आराखड्यासाठी सन २०२४-२५ मध्ये एकूण अर्थसंकल्पित तरतूद	आराखड्यासाठी सन २०२५-२६ मध्ये एकूण अर्थसंकल्पित तरतूद
१	२	३	४	५	६

जिल्हाधिकारी, सातारा तथा "संनियंत्रण अधिकारी"

"सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा Western Ghat Integrated Religious, Historical, Eco-Tourism Circuit Plan - अंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटन आराखडा"